## वार्ता टिपण दि.१०/०६/२०१७

**( गंभीर गुन्हयात फरारी असलेल्या गजा मारणे टोळीतील आरोपीस गुन्हेशाखेच्या गुंडा स्कॉड,दक्षिण विभागाने केले जेरबंद )**

पुणे शहर गुन्हेशाखे कडील संघटीत गुन्हेगारी विरोधी पथक दक्षिण विभागा मध्ये कार्यरत असणारे पोनिरी राम राजमाने यांचे पथकातील पो.हवा.गणेश साळुकें यांना दि.०९/०६/२०१७ रोजी बातमी मिळाली कि,सहकारनगर पोलीस स्टेशन गुन्हा रजी.१२४/२०१७ भा.द.वि.क. ३०७,३३६,३२३,५०४,५०६, ३४ या गुन्हयातील पाहिजे असलेला आरोपी नामे **गणेश सुभाष मसुरकर वय २५ वर्षे रा मु.पो.कोळवडी-नसरापुर ता.भोर जि.पुणे** हा त्याचे राहते पत्त्यावर आलेला असलेबाबतची बातमी मिळाल्याने त्याचा सदर ठिकाणी जावुन शोध घेऊन त्यास पोलीस स्टाफचे मदतीने शिताफिने पकडुन आमचे कार्यालयात आणुन त्याचेकडे चौकशी करुन त्याने सदरचा गुन्हा केल्याची आमची खात्री झाल्याने त्यास गुन्हयाचे पुढील कारवाईकामी सहकारनगर पोलीस स्टेशनला ताब्यात देणेत आले आहे.

**वर नमुद आरोपीचे विरुध्द पुणे शहरातील भारती विध्यापीठ सहकारनगर, पो.ठाणेस प्रत्येकी २ गुन्हे, वाकड पो.ठाणे १ गुन्हा तसेच पुणे ग्रामिण हद्दीतील राजगड पो.ठाणेस येथे प्रत्येकी २ गुन्हे, तसेच हवेली, पो.ठाणेस १ गुन्हा दाखल आहे, यास खुन,खुनाचा प्रयत्न,खंडणी अशा गंभीर गुन्हयात पुर्वी अटक झालेली आहे.तसेच कुख्यात गुन्हेगार गजा मारणे टोळीचे संपर्कात असल्याचे निष्पण्ण झाले आहे.**

सदरची कामगिरी गुन्हेशाखा,पुणे शहरचे श्री.प्रदिप देशपांडे सो-.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे, श्री.पंकज डहाणे सो,पोलीस उप आयुक्त,गुन्हे, श्री.सुरेश भोसले सो-सपोआ,गुन्हे-१, यांचे मार्गदर्शनाखाली गुंडा स्कॉड दक्षिण विभागाचे पोलीस निरीक्षक श्री.राम राजमाने, सहा.पो.फौज.राजेंद्रसिंगचौहान, शंकर जाभंळे, पो.हवा.गणेश साळुकें,भालचंद्र बोरकर,सुनिल चिखले, प्रविण तापकीर,दिपक भुजबळ, संजय बरकडे, पो.कॉ.कैलास साळुके,नितीन रावळ,राकेश खुणवे,प्रविण पडवळ,विवेक जाधव,रमेश चौधरं यांनी केली आहे.